नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३३ Issue - 333 | वार शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ Blow- Friday Date 24 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पश्चिम बंगाल, तामिळनाडूमध्ये विक्रमी मतदान

## पश्चिम बंगालमध्ये १५२ जागांसाठी ९१.३५ टक्के तर तामिळनाडूमध्ये २३४ जागांसाठी ८४.२९ टक्के मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आज म्हणजेच २३ एप्रिल, गुरुवारी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतदान झाले. बंगालमध्ये २९४ पैकी १५२ जागांवर पहिल्या टप्प्यातील मतदानात ९१.३५% मतदानाची नोंद झाली. तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांवर विक्रमी ८४.२९% मतदान झाले.

दोन्ही राज्यांच्या इतिहासात प्रथमच सर्वाधिक मतदान झाले. निवडणूक आयोगाची आकडेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंतची असून, त्यात बदल होण्याची शक्यता आहे.

यापूर्वी, ९ एप्रिल रोजी आसाम, केरळ आणि पुदुचेरीमध्येही विक्रमी मतदान झाले. आसाममध्ये इतिहासातील सर्वाधिक ८५.९१% मतदानाची नोंद झाली, पुदुचेरीमध्ये ९०% आणि केरळमध्ये १९८७ नंतरचे सर्वाधिक ७८.२७% मतदान झाले. या पाचही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी एकाच वेळी जाहीर केले जातील.



पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यासाठी १४७८ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद होत आहे. राज्यात सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट लढत आहे. निवडणूक काळात झालेल्या जाळपोळ, तोडफोड आणि मारहाणीच्या घटनांनी परिस्थिती तणावपूर्ण झाली आहे.

मुर्शिदाबादमध्ये एजेयूपी प्रमुख आणि रेजीनगरचे उमेदवार हुमायून कबीर यांच्या ताफ्यावर दंगलखोरांनी काठ्या आणि विटांनी हल्ला केला. या घटनेनंतर टीएमसी आणि एजेयूपी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संघर्ष झाला. कबीर यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून पोलिसांशीही त्यांचा वाद झाला.

दक्षिण दिनाजपूरमधील कुमारगंजमध्ये भाजप उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावरही हल्ला झाल्याचा आरोप आहे. बूथ जॅमिंगची तक्रार मिळाल्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या सरकार यांना काही जणांनी मारहाण केल्याचे त्यांनी सांगितले.

कूचबिहारच्या तुफानगंज परिसरात मोठा जमाव जमल्याने तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्रीय सुरक्षा दलांनी लाठीमार करत जमाव पांगवला. मालदामध्ये ईव्हीएम बिघाडामुळे संतप्त मतदारांनी निवडणूक अधिकाऱ्याला घेराव घालून ओलीस धरले. तसेच हरिश्चंद्रपूरमध्ये टीएमसीच्या दोन गटांमध्ये झालेल्या संघर्षात पक्षाच्या कॅम्प ऑफिसची तोडफोड करण्यात आली. सिलिगुरीमध्ये टीएमसी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये मतदान केंद्राबाहेर हाणामारी झाली. केंद्रीय दलांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

तृणमलू काँग्रेस अर्थात टीएमसीने बाहेरून गुंड आणल्याचा आरोप होत आहे. आसनसोल उत्तरचे उमेदवार मलय घटक यांनी पाच विशेष ट्रेनमधून बाहेरील लोकांना आणल्याचा दावा करत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

# बारामती आणि राहुरीच्या पोटनिवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्रात बारामती विधानसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५७.४८ टक्के मतदानाची नोंद झाली. तसेच राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५५.३१ टक्के मतदान झाले.



बारामतीत सकाळी ९ वाजेपर्यंत एकूण ८.१ टक्के मतदानाची नोंद झाली होती. सुरवातीच्या दोन तासांत मतदानाचा वेग काहीसा मंदावल्याचे दिसून आले. सकाळी ११ वाजेपर्यंत २०.५९ टक्के मतदान झाले होते. सकाळच्या टप्प्यात मतदानासाठी रांगा दिसून आल्या. त्यानंतर दुपारच्या टप्प्यात कडक उन्हामुळे मतदानाचा वेग काहीसा मंदावला. दुपारी १ वाजेपर्यंत ३१.९१ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर दुपारी ३ वाजेपर्यंत ४०.३६ टक्के मतदान झाले होते. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५२.४४ टक्के मतदान झाले होते. मतदानाची वेळ संपली तरी बारामतीच्या ग्रामीण भागात मतदानासाठी रांगा लागलेल्या होत्या. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडत असून कोणताही मोठा अनुचित प्रकार घडलेला नाही, अशी माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह आमदार रोहित पवार, जय पवार, पार्थ पवार यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

राहुरी विधानसभा पोटनिवडणूकीसाठी गुरुवारी मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. शहरी भागाच्या टक्केवारीत ग्रामीण भागातीलही टक्केवारी बरोबरीत तर काही ठिकाणी वाढल्याचे पहावयास मिळाले. सकाळच्या सत्रात मतदानाची टक्केवारी काहिशी संथ जाणवत असली तरी मात्र ९ नंतर या टक्केवारीत बऱ्यापैकी आघाडी घेतल्याचे चित्र होते. उन्हाच्या तप्त काहिलीत मतदानाचा टक्का घसरला. मात्र तो, दिवस सरता-सरता सावरल्याचेही निवडणूक विभागाच्या आकडेवारीनुसार दिसले. काही ठिकाणी नेहमीप्रमाणे ईव्हीएम मशीनच्या खोळंब्याने मतदानात खोडा घातला. तर किरकोळ अपवाद वगळता मतदान शांततेत पार पडल्याचे प्रशासनाने सांगितले. सकाळी ७ ते ११ या वेळेत १८ टक्क्यांपेक्षा जास्त मतदारांनी हक्क बजावला होता. नंतर उन्हामुळे मतदानाच्या वेगावर थोडा परिणाम झाला. पण दुपारच्या उन्हाची तीव्रता कमी झाल्यानंतर पुन्हा मतदानाचा वेग वाढला. अखेर राहुरीत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५५.३१ टक्के मतदान झाले. भाजपचे उमेदवार अक्षय कर्डीले आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे , उबाठाचे बंडखोर अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके आणि इतर अपक्ष तीन उमेदवार यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

# होर्मुझमध्ये सुरुंग पेरणाऱ्या छोट्या बोटींवर हल्ले करा, ट्रम्प यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

न्यूयॉर्क : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रथ सोशल या प्लॅटफॉर्मवर दोन पोस्ट केल्या आहेत. त्या पोस्टमधून त्यांनी इराणवर हल्लाबोल केला आहे. याशिवाय होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अमेरिकेचं पूर्णपणे नियंत्रण असल्याचं ट्रम्प म्हणाले आहेत. होर्मुझमध्ये स्फोटकांचे सुरुंग पेरणाऱ्या छोट्या बोटींवर हल्ले करण्याचे आदेश अमेरिकन नौदलांना दिल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका आणि इराण यांच्यातील दुसऱ्या टप्प्यातील शांततेची चर्चा पुढं जात नसल्यानं अशा प्रकारची आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसून येत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण त्यांच्या कठिण काळातून जात असून त्यांचा नेता कोण यासाठी ते संघर्ष करत आहेत, असं म्हटलंय. युद्धात कट्टरत लोक पराभूत होत आहेत त्यांचा आणि सुधारणावादी आहेत त्यांच्यात संघर्ष सुरु आहे. सुधारणावादी पूर्णपणे सुधारणावादी नसले तरी त्यांना थोड्या फार प्रमाणात आदर मिळतोय, हा वेडेपणा आहे. आमचं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण आहे. अमेरिकेच्या नौदलाच्या परवानगीशिवाय एकही जहाज सामुद्रधुनीत येऊ शकत नाही किंवा तिथून जाऊ शकत नाही. सामुद्रधुनीची पूर्णपणे नाकाबंदी करण्यात आली आहे. जोपर्यंत इराण करार करत नाही तोपर्यंत अशीच स्थिती राहील, असं डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्या एका पोस्टमध्ये अमेरिकन नौदलाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. इराणची कोणतीही जहाजं, छोट्या बोटी ( नौदलाची जहाजं १५९ असतील, जी समुद्राच्या तळाशी असतील) त्याद्वारे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील पाण्यात सुरुंग ठेवत असतील त्यावर हल्ले करुन नष्ट करा, असं ट्रम्प म्हणाले आहेत. अमेरिकन नौदलानं यासंदर्भात कोणतीही हयगय करु नये. सामुद्रधुनी पूर्णपणे मोकळी आणि स्वच्छ करत आहोत, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. सध्या सुरु असलेली कारवाई तिप्पटीनं वाढवा, अशा प्रकारचे आदेश देणारे आदेश ट्रम्प यांच्याकडून देण्यात आले आहेत.

# राज्यात लवकरच ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र उभारण्याचे काम तातडीने पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्राद्वारे (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन - एटीएस) केली जावी, यासाठी राज्यात ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून ही कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.




राज्यात स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव चेतन निकम, एआरएआय. उपसंचालक मकरंद पाठक आदी उपस्थित होते.

केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ मध्ये २३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील सर्व वाहनांची फिटनेस चाचणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांमार्फत करणे १ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे आता पारंपरिक मानवी तपासणी पद्धती बाद होणार आहे. याच अनुषंगाने राज्यात ७ केंद्रे पूर्ण झाली असून उर्वरित ३७ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे ऑगस्ट अखेर कार्यान्वित होतील आणि प्रलंबित तपासणी केंद्राबाबत अन्य विभागाशी समन्वयाने कार्यवाही करून तातडीने ती केंद्रे सुरू करण्याबाबतचे नियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यातील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे पूर्णत्वास न आल्याने राज्यातील काही परिवहन कार्यालयांच्या 'परिवहन/वाहन' पोर्टल प्रवेशावर केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे वाहनधारक व वाहतूकदारांना अडचणी निर्माण होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोर्टल प्रवेश तातडीने पुनर्संचयित करण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली आणि केंद्रानेही यास सकारात्मक प्रतिसाद देऊन निर्बंध उठविण्यात आले.

एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक

राज्यात सध्या सुमारे ४.३३ कोटी वाहने असून, त्यापैकी ३६.८० लाख वाहने परिवहन प्रवर्गातील आहेत. यातील सुमारे ९ लाख वाहनांना दरवर्षी फिटनेस चाचणी करणे आवश्यक ठरणार आहे. एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक होणार असून, मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने अचूकतेत वाढ होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रात एकूण ५३ शासकीय एटीएस केंद्रे उभारण्यात येत असून, देशातील एकूण २१४ केंद्रांपैकी सुमारे २५ टक्के केंद्रे राज्यात असणार आहेत. या प्रकल्पासाठी पाच वर्षांच्या संचालन व देखभालीसाठी सुमारे १,०३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, केंद्र शासनाकडून ३३७.७४ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग व कृषी विद्यापीठांच्या उपक्रमांवर उच्चस्तरीय बैठक

# राज्यातील सर्व कृषी विद्यापीठात ५० ग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स स्थापन करा, राज्यपालांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सर्व कृषि विद्यापीठात कृषी उत्पादन विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी पहिल्या टप्प्यात ५० ग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स सुरू करा. कृषी विद्यापीठात तयार होणाऱ्या कृषी उत्पादनांची विक्री व्हावी, शेतकऱ्यांना प्रशिक्षण मिळावे व कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना कृषी उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी हा उपक्रम राबवावा असे निर्देश राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी दिले. राज्यपाल वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन, मुंबई येथे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग व कृषी विद्यापीठांच्या उपक्रमांवर उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस पशुसंवर्धन विभागावे सचिव एन.रामस्वामी, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील, आणि राज्यातील प्रमुख कृषी विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पोस्ट-हार्वेस्ट मॅनेजमेंटबाबत योग्य मार्गदर्शन व सुविधा, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकरी उत्पादक कंपनीना याबाबत मार्गदर्शन करून त्यांना सक्षम करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी विद्यापीठांनी शैक्षणिक व प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ करून राष्ट्रीय स्तरावरील यूजीसी क्रमवारीत प्रगती साधावी. संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता व संस्थात्मक प्रशासनसुधारण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचवा. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रभावीपणे काम करावे असे निर्देश राज्यपालांनी दिले.



नंदूरबार येथे आदिवासी महाविद्यालयात कृषि विभागाच्या वतीने कौशल्य प्रशिक्षण राबविण्यात यावे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वतता, नवोन्मेष आणि शेतकरी-केंद्रित उपाययोजना राबविण्यासाठी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि शासनाचे विविध विभाग यांच्यात समन्वय वाढवावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी समन्वयातून सर्वांनी काम करावे. शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण होऊन त्यांचा उदरनिर्वाह अधिक सक्षम होईल असे उपक्रम राबविण्याचे आवाहन राज्यपालांनी केले.

लोकभवनचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले. पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागावे सचिव एन.रामस्वामी यांनी विभागाचे सादरीकरण केले. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. विविध नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येत आहे. मत्स्यव्यवसायिकांना शासकीय योजनांची माहिती होण्यासाठी विविध योजना पुस्तिका तयार करण्यात आलेल्या आहेत त्याचबरोबर या योजनांची प्रसिध्दी होण्यासाठी मोबाईल ग्रुप, चॅट बॉट, सुरू आहेत. या क्षेत्रात रोजगार वाढीसाठी योजनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. विकसित २०४७ च्या मिशन डाक्युमेंटप्रमाणे विभागाचे कामकाज सुरु आहे असे त्यांनी सांगितले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी कृषी विभागाचे सादरीकरण केले. महाविस्तार प ४० लाख लोकांनी डॉउनलोड केले आहे. महाग्री एआय धोरण, ॲग्रीस्टॅकमध्ये देशात व्दितीय क्रमांकावर आहोत. १.३२ कोटी लोकांनी ग्रीस्टॅक काढलेले आहेत. आदिवासी विकास विभागासाठी योजना, नैसर्गिक शेती शाळा, मॅग्नेट हा प्रोजेक्ट,एल निनोचा यावर्षी शेतीवर होणारा परिणाम, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रकिया योजना, कृषी विभागातील आकृतीबंद आणि त्यात केलेले बदल, आगामी तीस वर्षात कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, शाश्वत विकास होणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना याची माहिती दिली.

यावेळी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील यांनी महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे सादरीकरण केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली विद्यापीठाचे कुलगरु डॉ संजय भावे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी विद्यापीठाचे कुलगरु डॉ विलास खर्चे, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला विद्यापीठाचे कुलगरु डॉ. शरद गडाख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी विद्यापीठाचे कुलगरु डॉ. इंद्रमणी यांनी विद्यापीठांची सविस्तर माहिती व विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती राज्यपालांना सादर केली.

## संपादकीय....

### पारदर्शकता

राज्यातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्राद्वारे (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन - एटीएस) केली जावी, यासाठी राज्यात ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून ही कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले. राज्यात स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ मध्ये २३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील सर्व वाहनांची फिटनेस चाचणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांमार्फत करणे १ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे आता पारंपरिक मानवी तपासणी पद्धती बाद होणार आहे. याच अनुषंगाने राज्यात ७ केंद्रे पूर्ण झाली असून उर्वरित ३७ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे ऑगस्ट अखेर कार्यान्वित होतील आणि प्रलंबित तपासणी केंद्राबाबत अन्य विभागाशी समन्वयाने कार्यवाही करून तातडीने ती केंद्रे सुरू करण्याबाबतचे नियोजन करावे. राज्यातील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे पूर्णत्वास न आल्याने राज्यातील काही परिवहन कार्यालयांच्या 'परिवहन/वाहन' पोर्टल प्रवेशावर केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे वाहनधारक व वाहतूकदारांना अडचणी निर्माण होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोर्टल प्रवेश तातडीने पुनर्संचयित करण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली आणि केंद्रानेही यास सकारात्मक प्रतिसाद देऊन निर्बंध उठविण्यात आले. राज्यात सध्या सुमारे ४.३३ कोटी वाहने असून, त्यापैकी ३६.८० लाख वाहने परिवहन प्रवर्गातील आहेत. यातील सुमारे ९ लाख वाहनांना दरवर्षी फिटनेस चाचणी करणे आवश्यक ठरणार आहे. एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक होणार असून, मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने अचूकतेत वाढ होणार आहे. महाराष्ट्रात एकूण ५३ शासकीय एटीएस केंद्रे उभारण्यात येत असून, देशातील एकूण २१४ केंद्रांपैकी सुमारे २५ टक्के केंद्रे राज्यात असणार आहेत. या प्रकल्पासाठी पाच वर्षांच्या संचालन व देखभालीसाठी सुमारे १,०३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, केंद्र शासनाकडून ३३७.७४ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो.

भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत 'ग्राम' ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी 'ग्राम स्वराज्य' या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.

पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.

७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.

या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे.

पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.

तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.

या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून काम काज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.



राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.

आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.

शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी ओळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com

# तुझ्या रक्तामधला भीमराव पाहिजे पासून कुणी नाय केलं भलं व माय, भीमानं केलं पर्यंतचा सिने-गीतकार सागर पवार यांचा प्रेरणादायी प्रवास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अनेक गाणी आपल्या नेहमीच ओठांवर असतात. आपण ती ऐकतो, गुणगुणतो; मात्र त्या गाण्यांच्या मागे असलेल्या गीतकारांचा शोध फार कमी वेळा घेतला जातो. अशाच असंख्य लोकप्रिय गीतांचे प्रतिभावान कवी-गीतकार म्हणजे सागर पवार.

फुले, शाहू आणि आंबेडकरी चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी तसेच सांस्कृतिक चळवळ बळकट करण्यासाठी कवींनी मोठे योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार गाण्यांच्या माध्यमातून घराघरात पोहोचविण्याचे कार्य अनेक कलाकारांनी केले. त्यामध्ये ज्येष्ठ कवी सागर पवार यांचे नाव विशेष उल्लेखनीय आहे.

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे सागर पवार यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना लेखनाची विशेष आवड होती. त्यांनी ही आवड जपली आणि लेखणीला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवले. बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी आय.टी.आय.चा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर १९८७ साली सेंट्रल रेल्वेमध्ये त्यांना नोकरी मिळाली. १९९० मध्ये त्यांनी भोपाळ येथे सेवा बजावली, तर १९९४ मध्ये त्यांची बदली कल्याण येथे झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यामुळे सामाजिक जाणिवेतून लेखनाची प्रेरणा अधिक दृढ झाली. १९८८ मध्ये गायक कृष्णा शिंदे यांच्या कॅसेटसाठी त्यांनी पहिले गीत लिहिले. १९९० मध्ये भीमा तुझी पुण्याई हा त्यांचा पहिला अल्बम प्रदर्शित झाला आणि आंबेडकरी चळवळीत त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. त्यानंतर कोहिनूर दलितांचा हा अल्बम विशेष गाजला.

१९९३-९४ दरम्यान टी-सीरीजसारख्या नामांकित कंपनीसाठी त्यांनी विविध विषयांवर अनेक गीते लिहिली. २००१ मध्ये त्यांनी लिहिलेले भीमसूर्य क्रांतीचा पाहिला विधानात हे गीत सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या आवाजात संपूर्ण महाराष्ट्रात गाजले.

सागर पवार यांनी आपल्या लेखणीतून अनेक अजरामर गीते दिली. त्यापैकी काही गाजलेली गीते म्हणजे: तुझ्या रक्तामधला भीमराव पाहिजे, भीमसूर्य क्रांतीचा पाहिला विधानात, तुझ्या पाळण्याने साऱ्या जगाला हलविलं. सध्या भीम जयंती उत्सवात सर्वत्र गाजणारे गीत म्हणजे कुणी नाही केलं भलं व माय, भीमानं केलं दिल्लीचं दालन खुलं व माय, भीमानं केलं. हे गीत महागायक आनंद शिंदे यांच्या दमदार आवाजात महाराष्ट्रासह राज्याबाहेरही लोकप्रिय झाले आहे. तसेच बाहेरच्या देशातसुद्धा त्यांची गाणी लोकप्रिय ठरली आहेत. ही जादू सागर पवार यांच्या प्रभावी लेखणीचीच आहे.

विशेष म्हणजे, सागर पवार यांनी आपल्या लेखणीतून ११ हजारांहून अधिक गीते लिहिली आहेत. त्यापैकी ४ हजार गीते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित आहेत. तसेच लोकगीते, भीमगीते, प्रबोधनपर गीते आणि विविध सामाजिक विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांनी ३२ मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली आहेत. त्यांच्या गीतांना सुरेश वाडकर, महेंद्र कपूर, रवींद्र साठे, प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, आदर्श शिंदे, सुदेश भोसले, अवधूत गुप्ते, अनुराधा पौडवाल, साधना सरगम, वैशाली सामंत, बेला शेंडे यांसारख्या अनेक दिग्गज गायक-गायिकांनी स्वर दिले आहेत.

संगीतकार अशोक पत्की, कमलेश जाधव, मधू रेडकर, श्रीरंग आरस, अशोक वायंगणकर यांच्यासह अनेक मान्यवर संगीतकारांचा त्यांना सहवास लाभला. टी-सीरीज, व्हिनस, सम्राट म्युझिक, अल्ट्रा, शेमारू, नोकिया म्युझिक, कुणाल म्युझिक अशा विविध कंपन्यांनी त्यांची गीते प्रकाशित केली.



फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार आणि सामाजिक प्रबोधन घराघरात पोहोचविण्यासाठी सागर पवार यांनी आपल्या लेखणीतून मोलाचे योगदान दिले आहे. समाजप्रबोधनासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लेखणी चालवत राहीन, अशी भावना मुलाखत देताना माझ्याकडे व्यक्त केली आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याला सलाम.

**लेखक : कवी, पत्रकार – मिलिंद सुरेश जाधव पडघा, भिवंडी मो. ८६५५५६९४३६**



# सर्व मराठा समाजाने भगव्या झेंड्याखाली एकत्र येणे काळाची गरज : अर्जुन चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रत्येक गावातील तरुणांनी वाईट मार्गाच्या तसेच व्यसनाधीनच्या पाठीमागे न लागता आपल्या शेतीला जोड व्यवसाय म्हणून कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून नवीन उद्योग सुरू करावेत.

सर्व मराठा समाजाने भगव्या झेंड्याखाली एकत्र येणे काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगामध्ये टिकून राहायचे असेल तर आपला समाज ही त्यासोबत पुढे गेला पाहिजे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन आपला समाज उद्योजक कसा बनेल, तरुणांच्या हाताला काम कसे मिळेल, याकडे लक्ष द्यावे. आपला स्वतःचा विकास झाला तरच समाजाचा विकास होईल. तसेच बँक प्रकरणांमध्ये तरुणांना अडचणी येत असतील तर त्याही निश्चितपणाने सोडवल्या जातील असे आवाहन जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांनी केले.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली वाखरी येथे अखिल भारतीय मराठा महासंघाच्या नवीन चार शाखांचा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. युवक मराठा महासंघाच्या तीन शाखा- शिव प्रतिष्ठान वाखरी, संभाजी नगर वाखरी, छत्रपती ग्रुप, शिंदे मळा वाखरी आणि विद्यार्थी आघाडी मराठा महासंघ कै. आमदार अण्णासाहेब पाटील चौक वाखरी येथे एक अशा नवीन शाखा स्थापन करण्यात आल्या.

यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघ विद्यार्थी आघाडी जिल्हा संघटक म्हणून पै. चरण बबन साळुंखे आणि विद्यार्थी आघाडी शहराध्यक्ष म्हणून श्रीशांत धुमाळ यांची निवड ही करण्यात आली. या कार्यक्रमा वेळी प्रमुख उपस्थिती, नूतन पंचायत समिती सदस्य व गटनेते निखिलगीर (नाना) गोसावी, रमेश (दादा) पोरे पै. धनाजी पांढरे शाळा समिती अध्यक्ष,महादेव मस्के, सिताराम गाजरे, हरिदास साळुंखे,बबन साळुंखे,नारायण शिंदे, डॉ. गणपत पोरे, सचिन गंगथडे, संतोष जाधव, शिवाजीराव मोरे,हनुमंत कदम,नानासाहेब शिंदे, रोहित (भैया) चव्हाण, सोमनाथ बागल,सचिन थिटे, दिलीप उघाडे, बाळासाहेब लेंगरे, कीर्तीकुमार गायकवाड, दादा धनवडे,राजू कोळी (सर),अतुल शिंदे,रामदास पोरे, तुकाराम जगदाळे दत्तात्रेय (आण्णा) पोरे, विजय साळुंखे सह कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतन शाखा पदाधिकारी बबलू देवकर, श्रीयश पोरे, संकेत पोरे, प्रशांत बेडके, अर्जुन पोरे, समाधान जगताप, लखन शिंदे, रणजीत शिंदे, राहुल शिंदे, मंगेश शिंदे, विजय पवार, योगेश पोरे, अभिजीत शिंदे, पै.ऋषिकेश गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, नागेश कदम, विशाल भाकरे, संतोष पवार, प्रथमेश पोरे, जीवन साळुंखे, सचिन शिंदे, किरण साळुंखे, रोहन सुरवसे,सुमित गाजरे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गटबाजी संपवून एकसंघ रिपब्लिकन पक्ष वाढविण्याच्या आवाहनाला समाजातून मोठा प्रतिसाद : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष देशभर पोहोचविला आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट आ-हेत. राज्याबाहेर मात्र गटबाजी नाही. देशभरात २८ राज्य आणि ८ केंद्रशासित प्रदेशात मी रिपब्लिकन पक्ष पोहोचविला असून तिथे इतर कोणतेही रिपब्लिकन गट नाहीत.त्यामुळे एकच रिपब्लिकन पक्ष एकसंघपणे मजबूत उभा रहावा यासाठी रोज नवे गट स्थापन करणे बंद केले पाहिजे. नवे रिपब्लिक गट स्थापन करण्यापेक्षा एकाच रिपब्लिकन पक्षात आ-पले छोटे मोठे गट विसर्जित करून व्यापक मजबूत एकसंघ रिपब्लिकन पक्ष उभा केला पाहिजे असे आपण आवाहन केल्यानंतर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात समाजातून प्रतिसाद मिळत आहे.रिपब्लिकन सेने चे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आज त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह माझ्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली.

यापूर्वी आपल्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र पीपल्स रिपब्लिकन पक्षा-चे अध्यक्ष मिलिंद सुर्वे यांनी आ-पला गट रिपब्लिकन पक्षात विलीन करून त्यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला आहे.राज्यात अनेक ठिकाणी छोट्या संघटना आणि रिपब्लिकन गट हे रिपब्लिकन पक्षाची एकजूट व्हावी या विचाराचे आहेत.एकसंघ रिपब्लिकन पक्षासाठी अनेक गट माझ्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात विलीन होण्यास मोठा प्रतिसाद देतील असा मला विश्वास आहे असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

वेगळा नवीन रिपब्लिकन गट काढून गटबाजी वाढवण्यापेक्षा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात विलीन होऊन एकसंघ रिपब्लिकन पक्ष मजबुत उभा केला पाहिजे. त्यासाठी आपण केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर अतुट विश्वास ठेवुन रिपब्लिकन पक्षात प्रवेश करीत असल्याचे सांगत रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षात जाहीर प्रवेश केला. केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचे आशिर्वाद घेवुन त्यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आज रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश




# नांदेड येथे बुरुड समाजाची दहा जोडपी थाटात विवाहबद्ध सामुदायिक विवाह सोहळ्यातून सामाजिक ऐक्य घट्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : सामुदायिक विवाह सोहळ्यातून सामाजिक ऐक्य घट्ट होते ,सामाजिक एकोपा वाढून समाज एकजूट होण्यास मदत होते, असे प्रतिपादन माजी खासदर चंद्रकांत खैरे यांनी नांदेड येथील संपन्न झालेल्या भव्य, अभूतपूर्व व ऐतिहासिक सामुदायिक विवाह सोहळ्याला भेट दिल्यावर केले.सर्व वधु वरांना आशीर्वाद दिल्यानंतर ते बोलत होते.यावेळी नांदेड उत्तर आमदार बालाजीराव कल्याणकर, मूर्तिजापूरचे आमदार हरिषभाऊ पिंपळे,ढानकीच्या नगराध्यक्षा सौ.अर्चनाताई वासमवार व नागा स्वामी सुरेश नागेश्वर महाराज आदींची उपस्थिती लाभली होती. विवाह सोहल्याच्या माध्यामातुन समाजाचा वेळ व पैसा दोन्ही गोष्टीची बचत होते व समाजाची आर्थिक उन्नती होते, प्रतिपादन आमदार पिंपळे यांनी आपल्या मनोगतात केले,नांदेड ज़िल्हा बुरुड समाज संघटना ही महाष्ट्रातील उपक्रमशील संघटना असून त्याचे श्रेय अध्यक्ष मोहनराव पटकोतवार व सरचिटणीस संजय हळदे सर व त्यांच्या टीमला जाते,हे त्यांनी आवर्जून नमूद केले.

**माजी खा.चंद्रकांत खैरे यांचे प्रतिपादन**

या मेळाव्यामध्ये १० जोडपी विवाहबध्द झाली.महाराष्ट्र, तेलंगणा,मध्य प्रदेश व कर्नाटक या राज्यातील बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते. समाजातील अनेक समाज बांधवानी जोडप्यांना विविध भेट वस्तू देऊन आशीर्वाद दिले.या मेळाव्याची अन्न सेवा प्रसिद्ध व्यापारी श्री.बालाजीराव नागेश्वर,युवा नेते सचिन पेंढारकर व उदगीर बुरुड समाजाने नाही होती तर जलसेवा शिवाजी पोतुलवार, हणमंत सुनेवाड, मुन्ना गुळवे यांनी दिली.



यावेळी समाजाचे मार्गदर्शक श्री.बंडूजी गैनेवार, भिकाजीराव सूर्यवंशी, पत्रकार दशरथ वडतिले व महिला आघाडीच्या नेत्या सौ.मेनकाताई कोरडे आदी उपस्थित होते.

सदर मेळावा संपन्न करण्यासाठी नांदेड ज़िल्हा बुरुड समाज महिला संघटना अध्यक्षा मनीषा-ताई नागेश्वर,मंगलताई गुडमलवार, युवा अध्यक्ष साईदास नागेश्वर, मनीष जोरगेवार, सचिन नागेश्वर संघटनेचे उपाध्यक्ष साईनाथ गुडमलवार, आनंद गुडमलवार, मोहनराव वासमवार, कैलाश मुखेडकर, बाबुराव गुडमलवार, सायन्ना वाडे साहेब, शिव-ाजीराव नागेश्वर, शिवाजीराव गुडमलवार, विजय नागेश्वर, किरण नागेश्वर, बाला साहेब नागेश्वर, व्यंकट नागेश्वर, गणेशराव गुडमलवार, राजू पिल्लेवार, गणेश जोरगेवार,र ाजू गुडमलवार, संतोष सुनेवाड, गोविंद गुडमलवार, श्रीधर गुळवे, किशोर सुनेवाड, पंडित वासमवार, विक्रम देवके, ज्योती पटकोटवार, शारदा येलमेवार, नम्रता नागेश्वर, राधाबाई गुळवे ज्योती नागेश्वर सिन्धु वासमवार आदींनी विशेष परिश्रम घेतले, या सोहळ्याचे सूत्रसंचलन बालाजी देवके व संजय हळदे यांनी केले तर आभार मोहनराव पटकोतवार यांनी मानले.

# भोपाळ राज भावनात राज्यपाल गंगुबाई पटेल यांची, डॉ. विश्वास आरोटे यांनी घेतली सदिच्छा भेट, पत्रकारिता, व सामाजिक प्रश्नावर सविस्तर चर्चा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मध्यप्रदेश राज्याच्या राज्यपाल श्री गंगुबाई पटेल यांची भोप-ाळ येथील राजभावना दैनिक समर्थ गावकरी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रतिनिधी मंडळाने सदिच्छा भेट घेतली व या भेटीदरम्यान पत्रकारिता क्षेत्रातील बदलते स्वरूप ग्रामीण भागातील पत्रकारितेची आव्ह-ाने, व सामाजिक प्रश्न आणि लोक हिताच्या विविध विषयांवर सखोल सकारात्मक चर्चा झाली.




प्रतिनिधी मंडळाने राज्यपालांना संघटनेच्या कार्याची माहिती देत पत्रकारांच्या हक्काबाबत डिजिटल माध्यमांचा वाढत्या प्रभावाबाबत तसेच समाज हिताच्या उपक्रमाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी राज्यपाल गंगुबाई पटेल यांनी पत्रकारितेची जबाबदारी अध-ोरेखित करत समाजाच्या जड घडणीतील माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समृद्धी गावकरीची संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी राज्यपालांना गीता सार ही पुस्तिका भेट देऊन भारतीय संस्कृती व मूल्यांची जपणूक करण्याचे संदेश दिला.

तसेच अखिल भारतीय गुजरात समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून संजय पटेल यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव उपस्थित त्यांनी केला. या या भेटीला दैनिक समर्थ गावकरीचे समूह संपादक सेट नानाजी भाई खिमाजीबाई ठक्कर (ठाणे वाला) राम जानकी मंदिराचे पिठादिश्वर जगन जय महाराज. जबलपूर येथील नामांकित विधीतज्ञ अँड अरुण भाई चौधरी, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते संपूर्ण कार्यक्रमात आदरयुक्त व सकारात्मक वातावरण होते.

# सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेने पाणीपट्टी उजनी जलसंपदा विभागाकडे केली अदा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्था कार्यरत असून ही संस्था रोपळे शाखा क्रमांक १२ अंतर्गत येते ही संस्था अनेक वर्षापासून चेअरमन चंद्रकांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित येथील लाभधारक शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करण्याचे काम करत आहे.

मागील आठवड्यात या संस्थेच्या वतीने उन्हाळा हंगाम पूर्व आढावा बैठक घेण्यात आली



होती या बैठकीमध्ये प्रामुख्याने पाणी मागणी करणे ,व अर्ज भरणे, पाणीपट्टी जमा करणे आदी विषयावर चर्चा करण्यात आली होती यावर संस्थेचे चेअरमन सचिव व संचालक मंडळ लाभधारक शेतकरी या सर्वांच्या सहयोगाने उन्हाळी हंगाम २०२४-२ ०२५ व रब्बी हंगाम २०२५-२०२६ पाणीपट्टी पोटी आज शनिवार २८ मार्च रोजी जवळपास २ लाख ४० हजार रुपये पाणीपट्टी जमा केली यावेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत कदम सचिव मारुती लवंड, भीमा कालवा विभाग रोपळे शाखेचे शाखा अधिकारी पी .टी.माने ,नारायण चिंचोली चे उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण, संचालक जनार्दन कंदारे,

**सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेने उजनी जल संपादन विभागाची असलेली पाणीपट्टी जमा केली आहे.**

आप्पासाहेब वाघमोडे, मारुती वाघमोडे, बाभुळगाव पाणी वापर संस्थेचे चेअरमन दशरथ चव्हाण, हनुमंत खरात आदी मान्यवर संस्थेचे पदाधिकारी , लाभधारक शेतकरी उपस्थित होते. यावेळी सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्थेच्या वतीने शाखा अधिकारी माने यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना शाखा अधिकारी माने म्हणाले की सत्यनारायण देव कालवा पाणी वापर संस्था नियमित पाणीपट्टी भरत असून या संस्थेचे जलसंपदा विभाग उजनी यांना नेहमीच मोठे सहकार्य मिळत आहे असे सहकार्य भविष्यात ही करावे असे अपेक्षा व्यक्त करत संस्थेचे चेअरमन, सचिव, संचालक मंडळ व लाभधारक शेतकरी यांचे आभार मानले.

**पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शिक्षकांसाठी कार्यशाळा**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासक्रमाची कठोरपणे अंमलबजावणी करावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण मिळणार आहे,तसेच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोपक्रमशी-लता कार्यान्वित होणार आहे, त्यासाठी शिक्षकांनी अत्यंत कठोरपणे अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या जीवनाची वाटचाल सुखकर बनवावे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेने संस्थेतील सर्व शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवीन अध्यापन कौशल्ये शिक्षकांमध्ये रुजवण्यासाठी तीन दिवशीय कार्यशाळा कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित करण्यात आली होती त्यावेळी कार्यशाळेचा शुभारंभ करताना ते बोलत होते यावेळी तुकाराम जाधव दत्तात्रेय सावंत प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन होईल**

**विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन प्रकल्प, सादरीकरणे, गटचर्चा आणि कौशल्यांवर आधारित उपक्रमांद्वारे केले जाणार आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन साधने आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्म यांचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवण्यावर भर दिला जाईल असे मत यावेळी तज्ञ शिक्षक तुकाराम जाधव यांनी व्यक्त केले.**

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडींना प्राधान्य दिल्यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण होणार आहे, विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रगती दिसेल, शिक्षण अधिक दर्जेदार होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय दिगंबर जगताप यांनी करून दिला. सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी मानले.

**शिक्षण रोजगारक्षम व जीवनाभिमुख होईल**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना मूलभूत शिक्षणासोबतच कृतियुक्त शिक्षण आणि उद्योगांशी जोडलेले कार्यक्रम अभ्यासक्रमांत देण्यात आले असून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिक्षण केवळ परीक्षा पुरते मर्यादित न राहता जीवनाशी निगडित असले पाहिजे असे प्रतिपादन प्रशिक्षण देताना तज्ञ शिक्षक दत्तात्रय सावंत यांनी यावेळी व्यक्त केले.

# भाई किशोर भोसले यांचा यथोचित सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील बारा पोलीस व बलुतेदार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाई किशोर भोसले यांचा येथे सन्मान व सत्कार हरिभक्त पारायण श्री देवकर महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आला शिवस्वराज्य युवा संघटना महाराष्ट्र राज्य आठवा वर्धापन दिनानिमित्त शिवस्वराज्य पंढरी रत्न पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला.

या सोहळ्यास पंढरपूर येथील बारा बलुतेदार व बलुतेदार संघटनेची संस्थापक अध्यक्ष भाई किशोर भोसले यांना श्री देऊळकर महाराज यांच्या शुभहस्ते सन्मान चिन्ह देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला या सोहळ्यात पंढरपूरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके राजाभाऊ गायकवाड उपळकर, आदी मान्यवर उपस्थित होते बाई किशोर भोसले समाजाच्या हितासाठी झटणारे बहुजनाच्या चळवळीतील सहभागी होऊन बाजू मांडताना दिसतात बहुजनांचा बुलंद आवाज सतत समाजासाठी कार्यरत राहून या कार्याची दखल घेऊन शिवराज्य युवा संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ह्या स*** शिवस्वराज्य पंढरीरत्न बारा बलुतेदार समाज रत्न घेऊन भाई किशोर भोसले यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिवस्-वराज्य युवा संघटना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष मुटकुळे हे आहेत व भाई किशोर भोसले यांचा येतोच सन्मान करण्यात आला व त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# सामाजिक वनिकरण सिंदखेड राजा अमृतवनाची रोपे जळून खाक आग; लागली कां लावली याबाबत चित्र अस्पष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ तालुक्यातील सर्वच प्लांटेशन मध्ये घटनास्थळी एकही रोपे नसल्याने कुणीतरी तक्रार करणार असल्याची माहिती मिळाल्याने संबंधिताने हा प्रकार केल्याची शंका सामाजिक कार्यकर्ते गजानन कहाळे यांनी लेखी तक्रार अमरावती उउक्रयांच्याकडे केली आहे**

**■ जर सर्वं अधिकारी मुख्यालयी राहतात तर ही भीषण आग कदाचित संबंधित अधिकारी याचे डोळ्याचे ओपॅरेशन झाले असावे त्या मुळे कदाचित दिसले नसेल**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेड राजा : तालुक्यातील काळापानी नर्सरी लगतंच वनखंड क्र ५५१ मध्ये शासनाने मोठ्या कष्टाने मेहनतीने उभारलेला अमृतवन संबंधिताने आपण केलेला भ्रष्टाचार आगीचा वणवा उठला. छोट्या सजीव, वन्यजीव, पशु. पक्षी. प्राणी, तसेच वृक्ष आगीत हॉरपाळून खाक, या अगोदर ही या वनाला आग लागली होती मात्र तेव्हा ही वरिष्ठानी या कडे कुठलेच लक्ष केंद्रित न केल्याने शासनाचे लाखो रुपायाचा निधी सजीव श्रुष्टीचे सौंदर्य वैभव धुळीत मिसळून आपले भ्रस्टाचाराचे आरोप व पाप गंगेत धुऊन काढले आहे.

स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवाचे औचित्य साधून या अमृतवनाचे निर्मिती करून १ हेक्टर मध्ये ४०० रोपे संख्या लावून निर्मिती करण्यात आली होती. २०२३ पासून आतापर्यंत ती कुणाची जबाबदारी होती व या वनाला संरक्षण करण्यासाठी सुद्धा शासनाने मजूर सुद्धा दिलेला असतानी मात्र आग लागली कीं लावली याकडे मात्र बघावे लागनार. या आगीमध्ये नक्कीच खूप मोठा गोडं बंगाल दडलेले आहे अशी शंका सुद्धा नागरिकांनी केलेली आहे.

तसेच २०२३/२६पर्यंत जर लाखो रुपये खर्च करूनही प्लांटेशन जळत असतील व शासन निधीचा अपव्यय होत असतील तर अधिकारी व कर्मचारी मात्र केवळ पगारा पुरतेच मर्यादेत आहे कां त्याच्यावर काहीच जबाबदारी नाही कां असा ज्वलंत सवाल केला जात आहे. अमृत वनाच्या आराखड्या नुसार जर मार्च च्या आगोदर जलाई जाळरेषा नियमाप्रमाणे केली असती तर हा प्रकार घडलाच नस्ता, मात्र तसें न करत बोगस खोटे नाटे व्हाऊचरं कार्यालयाकडे सादर झाल्याने आपला भ्रष्टाचार उघड होऊ नये. हा प्रकार संबंधिताने केला असल्याची दाट शंका वाटत आहे. तसेच सर्वच सिंदखेड राजा तालुक्यात वृक्ष लागावाडीचा बट्याबोळ असल्याने आपला भ्रष्टाचार दाबण्यासाठीचा खासमखास प्रकार शोधला असल्यामुळे सर्वं प्रकरणाची सखोल तपासणी करून संबंधिताचे निलंबन करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते गजानन कहाळे यांनी लेखी स्वरूपात थेट उउक्र अमरावती यांचे कडे केली असून माहितीस्तव वनमंत्री साहेब सरकारी वनमंत्री सचिव मंत्रालय मुंबई व वनप्रधान व वनबल नागपूर तसेंचं आयुक्त अधिकारी महा. राज्य मुंबई यांना सुद्धा दिली आहे.

त्या मुळे आता तालुक्यातअखेर काय कार्यवाही होणार या कडे नागरिकांचे लक्ष वेधले आहे काय.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अक्कलकोट भिम नगर येथील भव्य मिरवणूकचे उद्घाटन अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास अक्कलकोट नगर परिषद नगराध्यक्ष श्री.मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष श्री. बंटी राठोड, अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक बिताडे, नगरसेवक आरोग्य सभापती श्री.अविनाश मडीखांबे, श्री चंद्रशेखर मडीखांबे, श्रीअजय मुकणार, श्री.फैजअहमद कोरबू, जयंती समिती अध्यक्ष श्री. नितेश मडीखांबे, विजय मडीखांबे, अजय मडीखांबे, प्रनेश बनसोडे, शुभम मडीखांबे, श्री.योगेश मडीखांबे, श्री. राजू जगताप, सिद्धारम टाके,भारत मडीखांबे श्री.स्वामीराव गायकवाड, श्री.राहुल रुही, श्री.सतीश सुतार, श्री.दशरथ मडीखांबे, स्वामी गायकवाड, पंच कमिटी दत्ता मडिखांबे, कल्याणी घाटगे, भारत सोनकांबळे, विजयकुमार बाळशंकर,उदय सोनकांबळे, सचिन मेजर मडीखांबे, शिवशरण शिंदे, बाळासाहेब मडीखांबे, तमा सुतार श्री शिलामानी बनसोडे,पंकज मडीखांबे, सिद्धार्थ बनसोडे, सिद्धार्थ साळे, प्रशांत मडीखांबे, विशाल सोनकांबळे, नागेश मडीखांबे, साई गायकवाड, भिम मडीखांबे, सचिन बनसोडे, शाम घटगे, दत्ता शिंदे, लखन वेस्कर,अप्पू गायकवाड, स्वामीराव मडीखांबे, आकाश मडीखांबे, दिनेश रुही, बंटी मडीखांबे,अंबादास बनसोडे, महादेव बनसोडे, सागर सुतार, रोहित वाघमारे, अमित बनसोडे आदींसह भीमसैनिक महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कांदलगावच्या कन्येची पोलीस दलात झेप: बेगम फकीर यांची सोलापूर ग्रामीण पोलीसपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नशिबाचे फासे उलटली तरी परिश्रमाची साथ सोडली नाही की यश हमखास मिळते. हे दक्षिण सोलापूर तालुक्यातील कांदलगाव येथील बेगम आमि नुद्दीन फकीर यांनी सिद्ध करून दाखवले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गरिबांवर मात करत बेगम फकीर यांनी महाराष्ट्र पोलीस दलात (सोलापूर ग्रामीण) स्थान मिळवून कांदलगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



बेगम फकीर यांचे वडील अमि नुद्दीन फकीर हे पेशाने बांधकाम मिस्त्री आहेत. हातावरची पोट असतानाही त्यांनी आपल्या मुलीच्या शिक्षणात आणि सोबत स्वप्नात कोणती उणीव बासु दिली नाही. वडिलांचे कष्ट आणि मुलीची अहोरात्र मेहनत यांचे फळ हे आज पोलीस दलातील निवडीच्या रूपाने एका मिस्त्रीच्या मुलीने वर्दी परिधान करण्याचे स्वप्न सत्यात उतरवल्याने संपूर्ण दक्षिण तालुक्यातील याचे कौतुक होत आहे. बेगम फकीर यांच्या या यशाबद्दल गावचे पोलीस पाटील कैलास खडके यांच्या हस्ते बेगम फकीर यांचा आणि त्यांच्या आई-वडिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना मान्यवरांनी बेगम यांची पोलीस दलातील निवड भरतीची तयारी करणाऱ्या इतर तरुण-तरुणीसाठी प्रेरणादायी असल्याची सांगितले.

याप्रसंगी उपस्थित कांदलगावची पोलीस पाटील कैलास कडते, माजी सरपंच रावसाहेब पाटील, माजी सरपंच शरीफ शेख सोमनाथ झोकारी ग्रामपंचायत सदस्य राम कोले, अण्णा वाघमारे पत्रकार राहुल उडणशिव यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेगम फकीर यांच्या बद्दल सर्व सरातून अभिनंदन वर्षा होत आहे. कष्ट करण्याची तयारी असेल तर गरिबी कधीही हर्षद ठरत नाही, अशा भावना यावेळी बेगम फकीर यांनी व्यक्त केल्या.

# मध्य रेल्वे आरपीएफ पथकाने सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला; ९ महिलांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कुर्डुवाडी : मध्य रेल्वे आरपीएफ पथकाने दिनांक २२.०४.२०२६ रोजी गाडी क्रमांक १२११५ सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला आणि या गुन्ह्याप्रकरणी ९ महिला गुन्हेगारांना अटक केली.




दिनांक २२.०४.२०२६ रोजी, कुर्डुवाडी स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या गुन्हे प्रतिबंध व शोध पथकाचे (उझऊ) हेड कॉन्स्टेबल श्री शिवाजी मुंडे यांना ३ महिला संशयास्पद रीतीने फिरताना दिसल्या. या महिलांना त्यांच्या ठावठिकाण्याबद्दल विचारपूस करण्यात आली आणि स्थानक सोडून जाण्याचा इशारा देऊन सोडून देण्यात आले. या महिला गाडी क्रमांक २२१०८ लातूर एक्सप्रेसमध्ये चढताना दिसल्या आणि त्यानंतर सोलापूर पथकाला संपूर्ण मार्गावर हाय अलर्ट जारी करण्याची माहिती देण्यात आली.

आरोपी जेऊर स्थानकावर उतरल्या, जिथून त्या दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गाडी क्रमांक १२११५ सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये चढल्या.

आरपीएफचे पथक आधीच कामावर होते आणि सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या एस्कॉर्टिंग टीमला, म्हणजेच हेड कॉन्स्टेबल हरमेंद्र प्रसाद मीना आणि कॉन्स्टेबल ब्रजेश यादव यांना संदेश देत होते. तसेच, छायाचित्रे, प्रवासी इत्यादींच्या मदतीने संशयितांवर सतत पाळत ठेवत होते.

लेडी कॉन्स्टेबल सोनम पठाण यांच्यासह आरपीएफ कर्मचाऱ्यांचे एक पथक सोलापूर स्टेशनवर तयार होते, जिथे सर्व ९ आरोपी महिला गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले. १८ ते ४० वर्षे वयोगटातील या संशयित महिला धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहेत.

आरोपींना जीआरपी/कुर्डूवाडीच्या ताब्यात देण्यात आले आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३१०(४) (दरोड्याची तयारी) अंतर्गत गुन्हा क्र. २६/२०२६ द्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे, ज्यामध्ये संशयितांच्या पूर्वीच्या गुन्हेगारी नोंदींचा आढावा घेतला जात आहे.

या टोळीबाबतची संबंधित माहिती पुणे विभागाला कळवण्यात आली आहे, कारण ते सोलापूर आणि पुणे या दोन्ही विभागांमध्ये कार्यरत असल्याचे ज्ञात आहे.

या प्रदेशात प्रवाशांची सुरक्षा आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाच्या (आरपीएफ) समन्वित प्रयत्नांचे मध्य रेल्वे कौतुक करते. प्रवाशांना सतर्क राहण्याचा आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास रेल्वे अधिकाऱ्यांना कळवण्याचा किंवा मदतीसाठी १३९ डायल करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

**बिअरबार मधील रोख रक्कमेसह लाखोच्या मालावर चोरट्यांचा डल्ला!**

# मेरा बुद्रुक येथिल सोहम बिअर बार अँड रेस्टॉरंट वर जबरी चोरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे /चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या मेरा बुद्रुक येथील मेरा बुद्रुक फाटा ते गाव रस्त्यावर असलेल्या सोहम बियर बार रेस्टॉरंटवर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या २.३० ते ३.०० वाजेच्या सुमारास चोरट्यांनी कुलूप तोडून बियर बार मधे असलेला लाखोचे बियर व विदेशी दारूचे बॉक्स चोरट्यांनी चोरून नेल्याची बाब दिनांक २३ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली.याविषयी सविस्तर माहिती अशी की निखिल पडघान यांचे मेरा बुद्रुक फाटा ते गाव रस्त्यालगत सोहम बिअर बार अँड रेस्टॉरंट आहे निखिल पडघान नेहमीप्रमाणे दिनांक २२ एप्रिल च्या रात्री १० वाजता बिअर बार बंद करून कुलूप लावून घराकडे गेले.




**पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवण्याची गरज**

**अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मेरा बुद्रुक येथे एक महिन्यांमध्ये ही दुसरी चोरी असून अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार रुपेश शक्करगे साहेब यांना विनंती आहे की आपण रात्रीची गस्त वाढवली तर अशा चोरीच्या प्रकरणाला आळा बसेल,जेणेकरून सर्वसामान्यांन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.**

**– सुनिल चेके, नागरिक मेरा बुद्रुक**

सकाळी बार मालक निखिल पडघान आठ वाजेच्या दरम्यान शेताकडे जात असताना ते बियर बार वर थांबले असता त्यांना बिअर शॉपी चे शटर अर्धवट खोललेले दिसले,कटरने दुकानाचे कुलूप तोडून दुकानाच्या बाहेर लावलेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वायर लाईटचे वायर त्यांना काटलेले दिसले,बियर बार त्यांनी खोलले असता बारमधील गोडाऊन मधील सर्वच विदेशी दारूचे बॉक्स त्यांना तिथे आढळून आले नाही, व बियर शॉपी मधील बियरचे बॉक्स सुद्धा चोरट्यांनी डल्ला मारल्याने या चोरीच्या घटनेची तक्रार अंढेरा पोलीस स्टेशनला दिली असून या चोरीच्या घटनेचा पुढील तपास अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार भरत पोफळे करीत आहे.